# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी **P.S.(ठाणे):** रत्नागिरी शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0252 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/07/2024 04:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 26/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/07/2024
**Time From (वेळेपासून):** 11:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:56 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/07/2024 **Time (वेळ):** 03:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 011
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/07/2024 03:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सहा निबंधक, सहकारी संस्था,रत्नागिरी व सावकारांचे, सहा निबंधक रत्नागिरी,यांचे कार्यालय येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस निरीक्षक रत्नागिरी शहर पोलीस ठाणे,ता.जि.रत्नागिरी,राज्य-महाराष्ट्र सत्यमेव जयते

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निखील अनिल बिर्जे वय-53 वर्षे मो.नं. 9420524888

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 556,क्यु पिवा पलेस रोड,रत्नागिरी,ता जि रत्नागिरी,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 556,क्यु पिवा पलेस रोड,रत्नागिरी,ता जि रत्नागिरी,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9420524888

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनायक रामचंद्र भोवड वय57 मुख्य लिपीक- सहा. निबंधक सहकार संस्था रत्नागिरी व सावकाराचे | | | 1. रा त्रिविक्रम नगर, ,कसोप सडा, ,ताजिरत्नागिरी,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

**9. Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 50,000/रु. | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी निखिल अनिल बिर्जे, वय ५३ वर्षे, व्यवसाय- बांधकाम कंत्राटदार तसेच आंबा व्यावसायिक, रा. ५५६ क्यु पिवा पॅलेस रोड, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी, मोबाईल नंबर ९४२०५२४८८८ फिर्याद लिहून देतो की,
मी बांधकाम कंत्राटदार तसेच आंबा व्यावसायिक आहे. मला सावकारी व्यवसायासाठी लागणारा परवाना काढावयाचा असल्याने मी विहीत नमुन्यातील अर्ज भरुन तो दिनांक २४/०५/२०२४ रोजी माझे मित्र श्री. काझी यांचे ताब्यात देवुन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रत्नागिरी यांचे कार्यालयात पाठवले होते. त्यावेळी पोच देणारे कर्मचारी यांनी मला दोन-तीन दिवसांनी भोवड साहेबांना भेटा असा निरोप देण्यास सांगितले. म्हणुन मी दोन-तीन दिवसांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रत्नागिरी कार्यालयात जावुन भोवड साहेबांना भेटलो. त्यावेळी मी त्यांना सावकारी परवान्याबाबत अर्ज सादर केला असल्याचे सांगुन अर्जाची पोच त्यांना दाखविली. त्यावेळी भोवड साहेबांनी सदर अर्जामध्ये श्रृटी असल्याचे सांगुन मला त्रुटींची पुर्तता करणेस सांगितले. भोवड साहेबांनी दिलेल्या त्रुटींची पुर्तता करुन मी तीन ते चार दिवसांनी पुन्हा भोवड साहेबांची त्यांचे कार्यालयात भेट घेवुन त्रुटींची पुर्तता केल्याचे सांगितले. त्यावेळी भोवड साहेबांनी योडेफार पैसे द्यावे लागतील असे सांगितले. भोवड साहेब हे माझ्याकडे लाच मागत असल्याची माझी खात्री झाल्याने व त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक २६/०६/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी येथील कार्यालयात जावुन पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांची भेट घेवुन त्यांना माझी तक्रार सांगुन त्यांचे समक्ष माझा लेखी तक्रार अर्ज लिहुन दिला. मी दिलेल्या तकारीचे अनुषंगाने त्याचदिवशी पुढील कार्यवाही करणार असल्याचे पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी मला सांगितले.
त्यानंतर पोलीस उपअधीक्षक चव्हाण यांनी जेसीबी स्टाफ व पंच यांना माझी ओळख सांगुन मला त्यांची ओळख करुन दिली. मी त्यांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगितली. पोलीस उपअधीक्षक चव्हाण व पंचांनी माझा तकारी अर्ज वाचुन त्यावर तसेच त्यासोबत सादर केलेल्या कागदांवर सहया केल्या. तकारी अर्ज व सोबतचे कागदपत्र पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर सदर तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मला पंचासह सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, रत्नागिरी येथे पाठविणार असल्याचे व भेटीदरम्यान माझे व लोकसेवक भोवड यांचेतील संभाषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी मला व पंचांना सांगितले.
पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व नवीन सीलबंद मेमरी कार्ड हजर केले. सदरचे मेमरी कार्ड त्यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घालुन त्यामध्ये अगोदरचे काहीही संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले नाही. याबाबत पंचाची खात्री करुन दिली. त्यानंतर त्यांनी स्वतःचे, माझे व पंचाचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी मला व पंच झाकणवाडे यांना लोकसेवकाची भेट झाल्यानंतर पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयात येण्याच्या सुचना दिल्या. पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या शर्टच्या आत बनियन मध्ये लपविला. त्यानंतर मी स्वतःचे चारचाकी वाहन नं.एमएच. ०८ एएक्स ९१५३ वाहनाने पंच झाकणवाडे यांचेसह जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात पोहचलो. त्यानंतर मी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयात गेलो. त्यावेळी पंच झाकणवाडे माझे मागोमाग येवुन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयात लोकसेवक भोवड व अन्य कोणास संशय येणार नाही अशा



पोलीस निरी.क. ... पोलीस ठाणे,ता.जि.रत्नागिरी,राज्य-महाराष्ट्र सत्यमेव जयते

रितीने थांबुन होते. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रत्नागिरी कार्यालयात गेल्यानंतर मी कार्यालयात लोकसेवक भोवड यांना भोवड साहेब बिर्जे....काल येवुन गेलो...काल रजेवर होतात काय... असे विचारले त्यावर लोकसेवक भोवड यांनी काल रजेवर होतो... बसा... कशा संदर्भात आलात साहेब... ?असे विचारले. त्यावेळी त्यांनी सावकारीचं लायसन्स काढायचय बघा असे सांगितले... त्यावर लोकसेवक भोवड यांनी हा... हा... हा.....असे बोलुन आपले टेबलवरील कोरा कागद घेतला व त्यावर ५०,००० रुपये असे लिहुन तो कागद मला दाखविला. त्यानंतर लोकसेवक भोवड यांनी सदरचा कागद फाडुन टाकला. त्यानंतर मी ठिक आहे. बर साहेब आता ते पन्नास हजार लिहुन दिलेयत ना.... असे बोललेे त्यावर लोकसेवक भोवड हा... असे बोलुन लोकसेवक भोवड यांनी नाय... ते वरती रेटच तसा आहे... कोणालाही विचारा तुम्ही... असे बोलले असता मी त्यांना कमी जास्त काहीतरी करुन दया... एक विनंती आहे असे सांगितले त्यावर लोकसेवक भोवड हे माझ काहीच म्हणण नाही... तुम्ही वरच्या वर सगळ सगळ भागवा माझ काहीही म्हणण नाहीय.. त्यावर मी त्यांना पैसे तुम्हालाच दयायला लागणार ना.... असे लोकसेवक भोवड यांना विचारले त्यावर नाही ... सगळ वरती.....म्हणुन तर चाललोय...ना...त्यावर मी कुठे दयायचे... असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी डी... डी....आर ऑफीसला.... असे सांगितले. त्यावर मी फायनल अमाउंन्ट सांगा असे लोकसेवक भोवड यांना विचारले असता लोकसेवक भोवड यांनी फायनलच पन्नास सांगतोय... असे मला सांगितले. त्यावर मी हे पन्नास हजार रुपयेच... त्याच्या खाली नाही. असे म्हणाले. त्यानंतर मी साहेब कधी द्यायचे असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी इथुन झाल की तुम्हाला कॉल करतो असे सांगितले. त्यावर मी त्यांना कधीपर्यंत होईल याबाबत विचारणा केली असता साहेब दोन तारखेला येणार आहेत.... दोन तारखेला त्यांची सही झाली की तीन तारखेला तुमच लायसन्स तुमच्या हातात असे लोकसेवक भोवड यांनी मला सांगितले. त्यावर मी त्यांना स्टेटस काय आहे ते कळवा किंवा मी तुम्हाला फोन करु का असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी चालेल असे मला सांगुन काम झाल्याशिवाय मी कुठलही घेत नाही..... असे सांगितले. त्यानंतर मी ठिक आहे..... ठिक आहे..... मग ते हयाच्यात सगळे.... सगळ्यांचच त्याच्यात असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी हो सगळ..... सगळ...... सगळ त्याच्यातच असे त्यांना सांगितले. त्यावर मी त्यांना तुमच्या सकट सगळ्यांचे पैसे त्याच्यात आले.... असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी नाय मी नाय माझ मुळी..... माझे मी पाचशे रुपयेच घेतो फक्त माझे जास्त नाहीत... असे बोलले. त्यावर मी ठिक आहे.... चला सर ओके... असे म्हणालो त्यावर लोकसेवक भोवड यांनी आणी तेही तुम्ही ऑनलाईन केलत आहेत.....त्यामुळे ते ही देण्याची गरज नाहीय.... असे म्हणाले, त्यानंतर मी ठिक आहे..... असे म्हणालो, त्यानंतर लोकसेवक भोवड मी फक्त ऑनलाईन करण्याचे घेतो बाकी काही नाही आहे.... असे म्हणाले. त्यानंतर मी बर ठिक आहे ओके येतो....असे बोललो व कार्यालयातुन बाहेर निघुन आलो. पंच झाकणवाडे देखील माझ्या मागोमाग कार्यालयाचे बाहेर आले. त्यानंतर मी माझे चारचाकी वाहनाने पंच झाकणवाडे यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, रत्नागिरी येथे परत आलो.

त्यावेळी पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी माझे जवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी मला घडलेली हकिकत विचारली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकिकत सांगितली. माझेत व लोकसेवक भोवड यांचेत समक्ष भेटीदरम्यान झालेले संभाषण ज्या डिजिटल व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत झाले, तो डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून लाऊडस्पिकर ऑन करून मी, पंचांनी व पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी त्यातील संभाषण ऐकले. त्यावेळी मी माझा व लोकसेवक भोवड यांचा आवाज ओळखला. सदर पडताळणीमध्ये माझा सावकारी व्यवसायाचा परवाना मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक रत्नागिरी कार्यालयास पाठवुन सावकारी व्यवसायाचा परवाना मिळवून देण्यासाठी लोकसेवक भोवड यांनी स्वतःसाठी व जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला देण्यासाठी ५०,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम सावकारी लायसन्सचे काम पूर्ण झाल्यानंतर एकमेकांशी संपर्क करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करुन पुढील सापळा कारवाई माझे सावकारी लायसन्सचे काम पुर्ण झाल्यानंतर माझे संपर्कात राहून करण्यात येणार असल्याचे पोलीस उप अधीक्षक चव्हाण यांनी मला व पंचाना सांगितले.

मी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी दिनांक ११/०७/२०२४ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रत्नागिरी व सावकरांचे सहाय्यक निबंधक, रत्नागिरी, ता.रत्नागिरी कार्यालयात जावुन लोकसेवक भुवड यांची भेट घेणार असुन त्यावेळी लोकसेवक भुवड हे लाच रक्कम स्विकारतील असे मी पोनि कांबळे यांची समक्ष भेट घेवुन कळविले होते. त्यानुसार दिनांक ११/०७/२०२४ रोजी पुढील सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि कांबळे यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक कांबळे यांच्या सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) (त्यामध्ये रु.

५००/-दराच्या १०० भारतीय चलनी नोटा) हजर केल्या. त्या नोटांचे नंबर पोशि गावकर यांनी एका कागदावर लिहुन काढले. पोनि कांबळे यांच्या सुचनेवरून पंच झाकणवाडे यांनी माझी अंगझडती पाहिली. अंगझडतीत मिळुन आलेल्या चीजवस्तु व रोख रक्कम मला परत करण्यात आले. ते मी होते तसे ठेवून दिले.
पोनि कांबळे यांनी ला.प्र.वि रत्नागिरी कार्यालयाचे गोपनीय कक्षात मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अँन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या वस्तूवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर काळया कपडयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविली. त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या. त्यानंतर उजेड करण्यात आला. पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून सपोफौ ओगले यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व त्या नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविल्या असता नोटांवर अगर त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर अँन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर लाप्रवि रत्नागिरी कार्यालयाचे गोपनीय कक्षात काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधार करून सपोफौ ओगले यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोनि कांबळे यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी सपोफौ ओगले यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर उजेड करण्यात आला. पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून सपोफौ ओगले यांनी सदरच्या नोटा एका सफेद रंगाच्या लिफाफ्यामध्ये ठेवुन तो सफेद रंगाचा लिफाफा पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवला. त्यावेळी मला पोनि कांबळे यांनी सूचना दिली की, लोकसेवक भोवड यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तो पर्यंत सदर लिफाफ्यास हात लावू नये असे सांगितले.
सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोलीस निरीक्षक कांबळे यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच लोकसेवक भोवड यांची लाच रक्कम देण्यासाठी भेट घेईन त्यावेळी आमच्यातील होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक कांबळे यांनी सापळा कारवाई करीता जात असल्याबाबतचे स्वतःचे, माझे व पंचांचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले. सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.
त्यानंतर पोनि कांबळे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आत बनियन मध्ये लपविला. ती वेळ ११.३० वाजताची होती. त्यानंतर मी व पंच झाकणवाडे असे माझे खाजगी चारचाकी वाहन क्रमांक नं. एमएच. ०८ एएक्स ९१५३ या वाहनाने लोकसेवक भोवड यांची भेट घेण्यासाठी जिल्हाधिकारी, कार्यालय रत्नागिरी आवारातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व सावकरांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी कार्यालयाचे कार्यालयाचे आवारात गेलो. त्यानंतर कार्यालयाचे आवारात वाहन पार्क करुन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व सावकारांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी कार्यालयात गेलो. त्यावेळी पंच झाकणवाडे माझे मागोमाग येवुन कार्यालयाचे बाहेर दरवाजा जवळ थांबुन होते. त्यावेळी मी कार्यालयातील लोकसेवक भोवड यांना साहेब येऊ का....? मग आता कसं काय... काम करायचं..? असे विचारले त्यावेळी लोकसेवक भोवड यांनी ते पुढचे पन्नास... असे त्यांनी सांगितले असता मी ते आता पन्नास हजार रुपये आणलेत मी... तुम्ही सांगितल्याप्रमाणे त्यातनं रक्कम काय.. विनंती आहे..• असे सांगितले त्यावर लोकसेवक भोवड यांनी वरती झालं तर तुम्हाला तुमचे परत करणार असे सांगितले. त्यावर मी त्यांना लायसन्स कधी मिळणार असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी पंधराला... हार्डली सोळा.. असे सांगितले. त्यानंतर मी देवु का... असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी आहे तसच.. वरतीच दयायचं... नाही आहे तसचं दया... असे सांगितल्यानंतर मी माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाच रक्कम असलेला सफेद लिफाफा उजव्या हाताने काढून लोकसेवक भोवड यांचे समोर धरला व मोजुन घ्या. असे सांगितले असता लोकसेवक भोवड यांनी यांनी अहो आहे तसचं दया... मी तसेच देणार.. असे बोलुन लाच रक्कम असलेला लिफाफा आपल्या उजव्या हाताने स्विकारला व समोरच्या टेबलच्या उजव्या बाजुच्या ड्रॉवर मध्ये ठेवला. त्यावेळी मी मोजून घेतलं तर बरं होईल असे सांगितले असता लोकसेवक भोवड यांनी एवढा विश्वास आहे की, असे सांगितले. त्यानंतर आमचेत सावकारी परवाना त्याची मुदत इत्यादी बाबत बोलणे चालु होते. त्यानंतर मी फक्त एकदा नजर टाका... असे म्हणुन पैसे मोजुन घेणेबाबत सांगितले. त्यावेळी लोकसेवक भोवड यांनी ड्रॉवरमधील लाच रक्कम असलेल्या लिफाफ्यामधील लाच रक्कम बाहेर काढुन ती लाच रक्कम मोजुन, हा... असे म्हणुन लाच रक्कम बरोबर पन्नास हजार रुपये असल्याबाबत मला सांगितले. त्यानंतर लाच रक्कम परत लिफाफ्यामध्ये ठेवली व सदरचा लिफाफा

ड्रॉवरमध्ये ठेवुन दिला. त्यानंतर मी ओके... येवु सर असे विचारले असता लोकसेवक भोवड यांनी हो चालेल... हेच लायसन्स चिपळुण मध्ये जास्तीचे करतो.. दुप्पट असे सांगितले. त्यानंतर बरं... चला असे सांगुन मी बाहेर निघुन इमारतीच्या तळमजल्यावर आलो व सापळा पथकास लोकसेवक भोवड यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा म्हणुन डाव्या हात वारंवार डोक्यावरुन फिरवुन इशारा केला. त्यावेळी पोनि कांबळे यांनी इमारतीच्या जिन्यामध्ये माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद करून तो स्वतःचे ताब्यात ठेवला. ती वेळ ११.५६ वाजताची होती.
त्यानंतर मी, पोनि कांबळे, पंच व सापळा पथक यांचेसह सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व सावकरांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी पोनि कांबळे यांनी लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत मला विचारणा केली असता, मी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व सावकरांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी कार्यालयामध्ये दरवाजाच्या डाव्या बाजुस असणा-या खुर्चीत बसलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करून ते लोकसेवक भोवड असल्याचे सांगितले.
मी कार्यालयामध्ये जावुन लाच रक्कम ५०,०००/-रूपये असलेला सफेद रंगाचा लिफाफा माझे पॅन्टच्या उजव्या खिशातुन उजव्या हाताने काढून लोकसेवक भोवड यांचेसमोर धरला असता त्यांनी तो सफेद लिफाफा त्यांचे उजवे हाताने स्विकारून लिफाफा त्यांचे समोरील टेबलच्या उजव्या बाजुच्या ड्रॉवरमध्ये ठेवला. त्यानंतर मी त्यांना पैसे मोजुन घेण्याबाबत सांगितले असता लोकसेवक भोवड यांनीलिफाफ्यातील लाच रक्कम बाहेर काढुन दोन्ही हाताने मोजली व त्यानंतर लाच रक्कम परत लिफाफामध्ये ठेवुन लिफाफा ड्रॉवर मध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच पोनि कांबळे यांनी लोकसेवक भोवड यांचा उजवा हात व पोना आंबेकर यांनी डावा हात पकडुन त्यांना अटकावुन ठेवले. ती वेळ १२.०५ वाजताची होती. त्यावेळी कार्यालयात शिपाई प्रितेश शिवदास इंगळे हे हजर होते. त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला हात कशासही लागणार नाही अशा स्थितीत कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. काही वेळानंतर पोनि कांबळे यांनी मला कार्यालयात बोलवुन लोकसेवक यांचे आडनाव भुवड नसुन भोवड असल्याचे सांगितले. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व सावकारांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी तालुका रत्नागिरी येथे काळ्या रंगाच्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करुन माझ्या हातांची व पॅन्टच्या उजव्या खिशाची अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या अंगठयासह सर्व बोटांचे पेरांना व पॅन्टच्या डाव्या बाजुचे खिशाचे वरील कडेला व आतील बाजुस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच देसाई यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळापुर्व कारवाईचे पुर्वी होत्या तशा वस्तु मिळुन आल्या. पोनि कांबळे यांचे सुचनेवरुन मी माझे हात धुतले.
त्यानंतर पोनि कांबळे पंच, सापळा पथक व लोकसेवक भोवड असे खाजगी वाहनाने व मी माझे चारचाकी वाहनाने लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालय रत्नागिरी येथे आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक कांबळे यांनी मला घडलेली हकिकत विचारली असता मी त्यांना घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक कांबळे यांनी माझे, लोकसेवक भोवड यांचेशी झालेले संभाषण ऐकवुन ते स्क्रिप्टप्रमाणे सारखेच असल्याची खात्री करून दिली. त्यावेळी मी माझा व लोकसेवक भोवड यांचा आवाज ओळखला, त्याप्रमाणे संभाषणात नावे नमूद करण्यात आली.
लोकसेवक विनायक रामचंद्र भोवड, मुख्य लिपीक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रत्नागिरी व सावकारांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी यांनी माझा सावकारी व्यवसायाचा परवाना मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक रत्नागिरी कार्यालयात पाठवुन सावकारी व्यवसायाचा परवाना मिळवुन देतो असे सांगुन माझ्याकडे दिनांक २६/०६/२०२४ रोजी ११.३० ते १३.०५ वाजताचे मुदतीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रत्नागिरी व सावकारांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी कार्यालयात स्वतःसाठी व जिल्हा उपनिबंधक रत्नागिरी कार्यालय यांना देण्यासाठी ५०,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम ५०,०००/-रुपये दिनांक ११/०७/२०२४ रोजी ११.१० ते ११.५६ वाजताचे मुदतीत लोकसेवक विनायक भोवड यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रत्नागिरी व सावकारांचे सहाय्यक निबंधक रत्नागिरी यांचे कार्यालयात पंचासमक्ष स्विकारली असल्याने माझी त्यांचेविरुध्द फिर्याद आहे.
माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहीला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAJENDAR TANAJEE SAWANT
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): PSMH26047
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ASI / 811
पोलीस ठाणे अंमलदार
रत्नागिरी शहर पोलीस ठाणे
जि.रत्नागिरी, राज्य-महाराष्ट्र
फोन-(०२३५२) २२२३३३

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Mahesh Mahadev Tc
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPMMT7502

पोलीस निरीक्षक
रत्नागिरी शहर पोलीस ठाणे, ता.जि.रत्नागिरी, राज्य-महाराष्ट्र
सत्यमेव जयते